# विश्वासणारे देवाच्या कुटुंबात एकमेकांची सेवा करतात

## नव्या करारातील 'एकमेकांविषयीच्या' आज्ञांचे पालन करण्यासाठी पवित्र आत्म्याच्या आध्यात्मिक कृपादानांची मदत विश्वासणाऱ्यांना मिळते.



विश्वासणारे आणि त्यांचे मेंढपाळ पाळक ह्यांनी लहान लहान गट तयार करावेत. गटातील प्रत्येकाला एकमेकांची उन्नत्ती करता यावी आणि प्रत्येकाला सेवाकार्यात सहभागी होता यावे इतपत गटाचा आकार मर्यादित असावा.

विश्वासणाऱ्यांनी एकमेकांची सेवा करावी असे गलती 5:13 हे वचन सांगते : ''तुम्हांला स्वतंत्रेकरिता पाचारण झाले. तरी त्या स्वतंत्रतेने देहवासनांना वाव मिळू देऊ नका. तर प्रीतीने एकमेकांचे दास व्हा.'' पवित्र शास्त्रात अशी अनेक 'एकमेकां विषयीची' वचने आहेत.

नव्या करारानुसार उपासकांच्या खूया शरीररूपी मंडळीमध्ये विश्वासणाऱ्यांनी लहान लहान गटांमध्ये एकत्र जमावे, यामुळे प्रत्येकाला प्रत्येकाशी संवाद साधता येईल तसेच सर्वांना भाग घेता येईल.''

- विश्वासणाऱ्यांनी एकमेकांचे ऐकून घेतलेच पाहिजे आणि देवाने आज्ञा दिल्यानुसार एकमेकांना आध्यात्मिक नियमानुसार मदत करावी. विश्वासणाऱ्यांनी एकमेकांना प्रोत्साहन देणे, एकमेकांसाठी प्रार्थना करावी, एकमेकांकडे आपल्या चुका कबूल कराव्यात इत्यादी.
- पवित्र आत्मा विश्वासणाऱ्यांना कृपादाने देतो. यामुळे त्यांना इतरांची सेवा करण्याचे सामर्थ्य मिळते तसेच त्यांच्या वाढीस हातभार लावता येतो.
- लहान गटांमध्ये विश्वासणाऱ्यांनी प्रत्येकाला बोलण्यास प्रोत्साहन देणे अगत्याचे असले तरी, लाजूयाबुजूया, नव्याने आलेल्या लोकांना त्यांची तयारी झाल्याशिवाय त्यांना बोलण्यास सांगू नये.
- विश्वासणाऱ्यांनी नव्या करारातील 'एकमेकां विषयींच्या' आज्ञांचे पालन त्यांच्या गटात आणि इतर गटांमध्येही करणे अगत्याचे आहे. उपासकांचे शरीररूपी मंडळीतील जीवन हे फक्त त्याच्या स्वत:च्याच मंडळीपुरते मर्यादित नसावे. एखाद्या लहान गटामध्ये पवित्र शास्त्रातील सर्व आध्यात्मिक कृपादाने नसतील म्हणून विश्वासणाऱ्यांनी गटागटांमध्ये मंडळीचे जीवन जगले पाहिजे. देव बरेचदा लहान गटातील प्रत्येक सदस्याला निरनिराळी आध्यात्मिक कृपादाने देतो. उदाहरणार्थ, समजा तुमचा गट सुवार्ता प्रसाराच्या कार्यात कमकुवत असेल तर सुवार्ता प्रसार करण्याचा वेगळा मार्ग शोधण्याचा खटाटोप करु नका. तर तुम्हांला मदत करण्यास तयार असणाऱ्या इतर गटातील वा मंडळीतील सुवार्तिकाचा शोध घ्या. तुमच्या गटाला वा मंडळीलाही इतरांना अशाच प्रकारे मदत करता येईल.
- विश्वासणाऱ्यांना लहान गटांमध्ये उत्तम प्रकारे संवाद साधता येतो त्यामुळे घराघरात आणि विश्वासणाऱ्यांना एकत्र येता येईल अशा ठिकाणी लहान मंडळयांचे आयोजन करा. उपासनेच्या सभांदरम्यान ते दोन वा तीन जणांच्या गटांना एकमेकांशी बोलण्यास, प्रार्थना करण्यास व योजना आखण्यास वेळ देतील.

विश्वासणाऱ्यांची सेवाकार्ये बळकट केली पाहिजेत. त्यासाठी विश्वासणारे व उपासक यांच्यात स्वेच्छेने प्रेमळ नातेसंबंध असावेत. याशिवाय अन्य कोणतीच गोष्ट कदाचित एवढी सामर्थ्यशाली नसेल.

## पुढाऱ्यांच्या जबाबदाऱ्या

- प्रत्येकाला प्रेरणा द्या. तुमच्या गटातील सर्व सदस्य आपआपली कृपादाने सेवाकार्यात एकमेकांच्या उन्नत्तीसाठी उपयोगात आणत आहेत हे पाहणे. ही मेंढपाळ -पाळक ह्या नात्याने तुमची जबाबदारी आहे (इफिस 4:11-16).
- समतोल राखण्याचे उद्दिष्ट ठेवा. कृपादानावर आधारित अशा फक्त एकाच सेवाकार्यावर अन्य सेवाकार्यांपेक्षा अधिक भर देऊ नका (1 करिंथ. 12:14-30). सर्वसाधारणपणे, मंडळी बलस्थान ठरलेले सेवाकार्यच अधिक प्रमाणात करते तेव्हा तो तिचा मोठाच दुबळेपणा ठरतो.
- मंडळयांमधील संपर्क यंत्रणा कार्यान्वित ठेवा. कोणत्याही लहान गटाकडे सर्वच आवश्यक आध्यात्मिक कृपादाने नसतात. नव्या करारातील मंडळीच्या जीवनात मंडळयांमध्ये संवाद-संपर्क असणे अगत्याचे आहे. उदाहरणार्थ, मासेदोनिया येथील ख्रिस्ती लोक गरीब होते पण त्यांना दान देण्याचे कृपादान होते आणि इतर ठिकाणी असलेल्या प्रभूच्या कार्याला बळकटी देण्यासाठी त्याचा त्यांनी उपयोग केला (2 करिंथ 8:1-5 आणि प्रे.कृ. 18:1-5 ह्यांची तुलना करा).

## नव्या करारातील 'एकमेकां' विषयीच्या आज्ञा

गटामध्ये आणि इतर गटागटांमध्ये प्रेमळ सहभागितेची उभारणी करा.

तुमच्या मंडळीने अत्यंत तातडीने अंमलात आणल्या पाहिजेत अशा आज्ञांचा अभ्यास करा. सभेला येणाऱ्यांना, प्रथम कोणत्या आज्ञांचा अभ्यास करुन अमंलात आणायच्या ते ठरवू द्या.

### 1. प्रीती

- एकमेकांवर प्रीती करा : योहान 13:34-35; 5:12 व 17; रोम 12:10; 1 थेस्सल 4:9; 1 योहान 3:11,14 व 23; 4:7,11 व 12; 2 योहान 1:5; 1 पेत्र 1:22
- नियमशास्त्र परिपूर्ण करण्यासाठी एकमेकांवर प्रीती करा : रोम 13:8
- एकमेकांवरील आमची प्रीती विपुल व्हावी : 2 थेस्सल 1:3
- एकमेकांवरील प्रीतीने समृद्ध व्हा : 1 थेस्सल 3:12
- पापांची रास झाकून टाकण्यासाठी निष्ठेने प्रीती करा : 1 पेत्र 4:8

### 2. सहभागिता व समेट

- एकमेकांबरोबर सहभागिता ठेवा : 1 योहान 1:7
- एकमेकांची क्षमा करा : इफिस 3:13; 4:32; कलस्सै 3:13
- एकमेकांना पवित्र चुंबनाने सलाम करा (काही संस्कृतींमध्ये अलिंगन दिले जाते) : रोम 16:16; 1 करिंथ 16:20; 2 करिंथ 13:12; 1 पेत्र 5:14
- भोजनासाठी एकमेकांची वाट पाहा : 1 करिंथ 11:33
- एकमेकांचे दु:ख वाटून घ्या : 1 करिंथ 12:26

### 3. सेवा करा

- प्रत्येकाला ज्याप्रमाणे कृपादान मिळाले असेल त्याप्रमाणे एकमेकांची सेवा करा : 1 पेत्र 4:10
- प्रीतीने एकमेकांची सेवा करा : गलती 5:13
- एकमेकांवर दया करा : 1 थेस्सल 5:15
- एकमेकांची काळजी घ्या : 1 करिंथ 12:25

- एकमेकांची ओझी वाहा : गलती 6:2
- नम्र सेवेचे प्रतिक म्हणून एकमेकांचे पाय धुवा : योहान 13:14
- एकमेकांबरोबर काम करा : 1 करिंथ 3:9; 2 करिंथ 6:1

**4. शिक्षण द्या**

- एकमेकांना शिकवा : कलस्सै 3:16
- एकमेकांना बोध करा : रोम 5:14

**5. प्रोत्साहन द्या**

- एकमेकांना उत्तेजन द्या : कलस्सै 3:16; इब्री 10:25
- एकमेकांना बोध करा : इब्री 3:13
- एकमेकांशी सत्य बोला : इफिस 4:25
- एकमेकांकरीता आपला प्राण द्या : 1 योहान 3:16
- प्रीती व सत्कर्मे करण्यासाठी एकमेकांना उत्तेजन द्या : इब्री 10:24

**6. प्रार्थना करा, कबुली द्या आणि उन्नत्ती करा**

- एकमेकांकरीता प्रार्थना करा : याकोब 5:16
- आपली पातके एकमेकांजवळ कबुल करा : याकोब 5:16
- एकमेकांना बोध करा (बळकटी द्या, उभारणी करा). 1 थेस्सल 4:18 व 5:1 व 11
- एकमेकांची उन्नत्ती स्तोत्र गाऊन, मार्गदर्शन करुन, प्रकटीकरण सांगून, भाषांमध्ये बोलून किंवा अर्थ सांगून करा : 1 करिंथ 14:26
- एकत्रितपणे देवाचे गौरव करा : रोम 15:6

**7. नम्रपणे ऐक्य साधा**

- एकमेकांना आदराने वागवा : रोम 12:10
- एकमेकांशी एकचित्त व्हा : 2 करिंथ 13:11; रोम 12:16; 15:5
- एकमेकांवर टीका करु नका : रोम 14:13
- एकमेकांविषयी वाईट बोलू नका : याकोब 4:11; 5:9
- एकमेकांच्या अधीन राहा : इफिस 5:21
- नम्रतेचा कमरबंद नेसून एकमेकांची सेवा करा : 1 पेत्र 5:5

**8. एक वाक्यतेने जीवन जगा**

- एकमेकांचे सहन करा : इफिस 4:2
- एकमेकांबरोबर शांतीने राहा : मत्तय 9:50
- एकमेकांचा पाहुणचार करा : रोम 15:7; 1 पेत्र 4:9

**प्रत्येकाला त्यांच्या कृपादानांची ओळख करुन द्या आणि एकमेकांची सेवा करण्यासाठी**

त्यांचा उपयोग करण्यास मदत करा येथे पवित्र शास्त्रातील व्यक्तीशी निगडीत अशा बहुतेक कृपादानाची यादी उदाहरण म्हणून दिली आहे, स्पष्टीकरणासाठी तुम्हांला याचा उपयोग होईल.

## रोम 12:6-8 मध्ये नमूद केलेली आध्यात्मिक कृपादानांचा प्रत्यक्ष उपयोग करा.

पुढे कृपादानांची यादी दिलेली असून त्यातील जी कृपादाने तुमच्या गटात असावीत त्यांच्यापुढे, ( ) कंसात खूण करा. तुम्हांला कदाचित् इतर गटांकडून मदत घ्यावी लागेल आणि तुमचा गट ज्या क्षेत्रात निष्णात असेल त्या संदर्भातील मदत दुसऱ्यांना करावी लागेल.

( ) सेवा करा सेवक, प्रे.कृ. 6:1-7.

( ) भविष्य कथन. सामर्थ्य, सांत्वन व प्रोत्साहन मिळावे यासाठी देवाकडून आलेला संदेश, 1 करिंथ 14:3

( ) दान द्या. अबिगईल, 1 शमुवेल 25, मार्गदर्शक तत्वे : 2 करिंथ 9,

( ) शिक्षण द्या. एज्रा, नहेम्या 8, इफिस 4:11-16

( ) प्रोत्साहन द्या. प्रेरणा द्या : पौल आणि इफिस येथील वडीलजन, प्रे.कृ. 20:17-38

( ) पुढारीपण करा. इतरांना सेवेत साहाय्य करणारे सेवक-पुढारी व्हा, मोशे, निर्गम 18:13-26

( ) दया करा. दावीद व शौल, 1 शमुवेल 24

## 1. करिंथ 12:7-11 व 27-30 मध्ये नमूद केलेल्या कृपादानांचाही प्रत्यक्ष उपयोग करा.

( ) सुज्ञतेने मार्गदर्शन करा. शलमोन, 1 राजे 3:5-28

( ) निर्णय ज्ञानावर (वस्तुस्थिती) आधारित असावेत. बिरुयातील लोकांनी वचनाचा शोध केला, प्रे.कृ. 17:10-12.

( ) मदत करा. अक्विल्ला व प्रिस्किल्ला, प्रे.कृ. 18:1-5, 24-28.

( ) जा, प्रेषित म्हणून (''पाठवलेले'') रोम 5:20-21; पौल प्रे.कृ. अध्याय 13-14.

( ) तारतम्याने वागा. नाथाना : 2 शमुवेल अध्याय 11 व 12

( ) बरे करा. पेत्र व योहान ह्यांनी एका लंगडया मागणसाला बरे केले प्रे.कृ. अध्याय 3-4

( ) व्यवस्था पाहा. नहेम्या : नहेम्या अध्याय 2-3

( ) अद्‌भुत चमत्कार करा. एलिया : 1 राजे 18:16-46; अलीशा: 2 राजे अध्याय 2-5

( ) अन्य भाषांमध्ये बोला. कर्नेल्याचे कुटुंबिय, प्रेकृ. 10:44-48. हे कृपादान पुढील गोष्टींसाठी वापरा :

( ) भाषांचा अर्थ समजावून सांगा. 1 करिंथ 14 मधील सावधगिरीचा इशारा पाहा.

( ) विश्वासाचा उपयोग करा (सर्वांनाच याची गरज असते पण काही जणच यासाठी इतरांना जागृत करतात). कुष्ठरोगी आणि शताधिपती, मत्तय 8:1-13, जुन्या करारातील विश्वासूजन, इब्री 11.

## इफिस 4:11 मध्ये नमूद केलेल्या यादीतील कृपादानांचाही उपयोग करा

( ) सुवार्तेची घोषणा करा (सुवार्तिक) फिलिप्प, प्रे.कृ. 8:26-40

( ) पाळक (मेंढपाळ). इफिस येथील वडीलजन, प्रे.कृ. 20:28-34; 1 पेत्र 5:1-4.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net